## प्रेस नोट

### फरासखाना पोलीस स्टेशन तपास पथकाने केलेली उत्कृष्ट कामगिरी
### अमेरीकन डॉलर देतो म्हणुन फसवणुक करणारे टोळीस अटक

फिर्यादी आशिष विजय चव्हाण वय ३९ व्यवसाय व्यापार रा.आंबेगाव खुर्द
थोडक्यात हकीगत फिर्यादी यांचे बुधवार पेठ पुणे येथे चप्पल बुट विक्रीचे दुकान आहे. ते दुकानात असताना आरोपी नामे बबलु हरीश शेख हा गि-हाईक म्हणुन आला त्यावेळी त्याने एक ७५०/- रुपयाचा स्पोर्ट शुज खरेदी केला. बबलु शेख याने शुजचे पैसे दिल्यावर त्याचेकडील अमेरीकन २० डॉलरची नोट फिर्यादी यांना दाखवुन ती तुमचेकडे चालते का असे विचारले. फिर्यादी यांनी त्यास नाही म्हणुन सांगितले तर आरोपी याने त्यांना या डॉलरची किंमत ७०/- रु. आहे मी तुम्हास ३०/- रु.देता असे सांगुन खिशातुन आणखी डॉलर काढुन त्यातील एक फिर्यादी यांना देवुन तो तुमच्याकडे चालतो बघा व खात्री झाल्यावर सांगा असे म्हणुन आरोपीने त्याचा मोबाईल नंबर देवुन फिर्यादी यांचा मोबाईल नंबर तो निघुन गेला. फिर्यादी यांनी डॉलर खरा आहे की खोटा याची मित्र परीवारात खात्री केल्यावर आरोपीने दिलेल्या मोबाईल नंबरवर त्यांनी फोन केला.

त्यानंतर दि.०६/०६/२०१९ रोजी आरोपीने फिर्यादी यांना फोन करुन डॉलर पाहण्यास दांडेकर पुलाजवळ बोलावले. फिर्यादी तेथे गेल्यावर आरोपीने त्यांना कॅनॉलकडे नेले व व तेथे खरे अमेरीकन डॉलर दाखवीले. त्यावर फिर्यादीचा विश्वास बसल्याने त्यांचेत १,५०,०००/-रुपयात ५०० डॉलर देण्याचा व्यवहार ठरला.

दि.०८/०६/२०१९ रोजी आरोपी हे श्रीकृष्ण टॉकिज बुधवार पेठ पुणे येथे आले व त्यांनी फिर्यादीस फोन करुन डॉलर आणल्याचे सांगितले. फिर्यादी हे श्रीकृष्ण टॉकिज जवळ गेले असता आरोपीने त्यांचेकडील अमेरीकन डॉलर ठेवलेली कॅरिबॅग फिर्यादी यांना दिली व त्यांचेकडुन १,५०,०००/- रुपये घेवुन निघुन गेले. त्यानंतर फिर्यादी हे दुकानानत गेल्यावर त्यांनी कॅरिबॅग उचकटुन पाहता त्यामध्ये एक अमेरीक २० डॉलरची नोट व कागदी गुंडाळी दिसुन आली. त्यानंतर फिर्यादी यांनी त्यांची फसवणुक झाल्याबाबत फरासखाना पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १९६/२०१९ भा.द.वी.कलम ४०६,४२०,३४ अन्वये तक्रार दिली.

दाखल गुन्हयाचा तपास करताना सिसिटीव्हा फुटेज प्राप्त करुन घेवुन ते फिर्यादी यांना दाखविता त्यांनी यातील आरोपींना तात्काळ ओळखले. त्यावरुन आरोपींचा माग काढीत असताना ते जनता वसाहत दांडेकर पुल येथे असल्याची गुप्त बातमी पोलीस नाईक दिनेश भांदुर्गे यांना समजली.

प्राप्त बातमीवरुन मा.वरिष्ठांचे आदेशावरुन फसवणुक करणारे आरोपी नामे १) बबलु हरेश शेख वय ४५ वर्षे व्यवसाय काहीनाही रा.ई ७७ पडपडगंज थाना मदनडेरी लक्ष्मीनगर न्यु दिल्ली २) सेतु आबु मतुबुर वय २० वर्षे व्यवसाय काहीनाही रा ग्राम खैरे थाना गुवाहीटी राज्य आसाम ३) सिंतु मुतलीक शेख वय ३६ वर्षे व्यवसाय काहीनाही रा. ग्राम अंदकोट केलाबावडी थाना अजमेर राज्य राज्यस्थान ४) रिदोई महमद रहीम खान वय १९ वर्षे व्यवसाय काहीनाही रा.बबाना जे जे कॉलनी वेस्ट ई ब्लॉक नवी दिल्ली यांना दांडेकर पुलाजवळील पेट्रोलपंप सापळा रचुन पाठलाग करुन शिताफीन पकडले. त्यावेळी त्यांचे साथीदार कबीर इस्माईल शेख रा.दिल्ली व महिला नामे झांगी हे दोघेजण पळुन गेले. त्यावेळी आरोपींची अंगझडती घेता बबलु

शेख याचेकडे खोटे अमेरीकन डॉलरचे बंडल, गुन्हयात वापरलेला मोबाईल व सिमकार्ड तसेच कागदी गुंडाळी मिळुन आली. सदरचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

यातील वर नमुद आरोपींकडे केले तपासात त्यांनी आजतागायत अमेरीकन डॉलर देवुन हडपसर, चंदननगर, खडकी, शिवाजीनगर परिसरात गुन्हे केल्याचे कबुल केले आहे. अशा प्रकारे फसवणुक करणा-या ब-याच टोळया कार्यरत असल्याची त्यांचेकडुन माहिती प्राप्त झाली आहे. सदरचे आरोपी हे पश्चिम बंगाल दिल्ली उत्तर प्रदेश आसाम राजस्थान या ठिकाणचे राहणारे आहेत.

सदरची कारवाई मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे शहर,श्री.मंगेश शिंदे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१ पुणे श्री.सुहास बावचे, सहाय्यक पोलीस आयुक्त फरासखाना विभाग पुणे श्री.प्रदीप आफळे यांचे मार्गदर्शनाखाली श्री.किशोर नावंदे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक फरासखाना पोलीस स्टेशन पुणे, तसेच पोलीस उपनिरीक्षक यशपाल सुर्यवंशी, पोहवा बापु खुटवड, केदार आढाव, पोलीस नाईक दिनेश भांदुर्गे, सुरेंद्र जगदाळे, सयाजी चव्हाण, विशाल चौगुले, पंकज देशमुख, राजु देवकर, विकास बो-हाडे, शंकर कुंभार, महाविर वलटे, मोहन दळवी, आकाश वाल्मीकी, अमेय रसाळ, मयुर भोकरे यांनी केली आहे.

**नोट :- पुणे शहर पोलीस आयुक्तालयातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अमेरीकन डॉलर दाखवुन नागरीकांची फसवणुक करणा-या टोळया सध्या पुणे शहरात कार्यरत असुन अशा प्रकारचे कोणी आमीष दाखवित असल्यास त्याची माहिती तात्काळ पोलीसांना दयावी. तसेच आपला पॅन कार्ड नंबर, एटीएम नंबर, बँक खाते क्रमांक, ओटीपी, व इतर खाजगी माहिती कोणासही देण्यात येवु नये.**


चर्चासत्र
पुणे पोलीस


चर्चासत्र
पुणे पोलीस